

ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेत सुवर्णपदक पटकावलेले मराठा मंदिर ग्लोबल स्कूलचे विद्यार्थी.

# 'ब्रेन डेव्हलपमेंट'मध्ये ग्लोबल मराठा मंदिरचे यश

रत्नागिरी : येथील मराठा मंदिर ग्लोबल स्कूलच्या सीबीएसई माध्यमच्या शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी केली. विहान ओसवालने भारतामध्ये १८ वा क्रमांक पटकावून सुवर्णपदक पटकावले. राष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेल्या या ब्रेन डेव्हलमेंट स्कॉलरशिप या स्पर्धा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये शाळेतील दुसरीतील विद्यार्थी विहान ओसवाल याने भारतामध्ये १८ वा क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. रियांश तिवारीने भारतामध्ये ८३वा क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले. तिसरीच्या अर्णव शिंदेने रौप्यपदक, दुसरीच्या ओवी वाडेकर व तिसरीतील वरूणिका बोडकेने कास्यपदक पटकावले. शाळेच्या मुख्याध्यापिका कविता विश्वकर्मा यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.